# सातारा जिल्हा परिषद सातारा,

## सामान्य प्रशासन विभाग

**कार्यालयाचा पत्ता** -: जिल्हा परिषद मुख्य इमारत,4 था मजला सदरबझार,सातारा कोरेगाव रोड,कॅम्प -सातारा.जि.ता, 415 001.
**कार्यालय दुरध्वनी** -: 02162295053
**Email**-: dyceogadstr@gmail.com

जा.क्र.साप्रवि/आस्था1(5)/अकंपा/25/21
दिनांक : 22/02/2021

प्रति,

खाते प्रमुख ------------------------------ सर्व
जिल्हा परिषद सातारा.
गट विकास अधिकारी, सर्व
पंचायत समिती ------------------------
कार्यालय प्रमुख ------------------------ सर्व
जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिपत्याखालील सर्व कार्यालय

विषय :- अनुकंपा तत्वावर भरतीबाबत माहे जानेवारी 2021 अखेर तात्पुरती जेष्ठता यादी प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.अकंपा-1219/प्र.क्र.56/आठ, दि.11 सप्टेंबर, 2019

वरील विषयास अनुसरून कळविणेत येते की, जिल्हा परिषद सातारा यंत्रणेमध्ये कार्यरत असताना आजारपणामूळे, अपघातामूळे व इतर काही कारणाने शासकीय कर्मचा-याचे सेवेत असताना मयत होत आहेत. सदर शासकीय कर्मचा-याच्या मृत्युनंतर त्याच्या कुटूंबावर ओढवणा-या आर्थिक परिस्थितीवर मात करणेकरीता अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिवंगत कर्मचा-याच्या एका वारसास अनुकंपा नियुक्ती योजना लागू केली आहे.

त्या अनुषंगाने माहे एप्रिल 2020 मध्ये 10 टक्के अनुकंपा भरती करणेत आलेली आहे. तरी संदर्भिय शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या पद भरतीच्या मर्यादेबाबत प्रतिवर्षी रिक्त असलेल्या पदांपैकी पद भरण्यास मान्यता असलेल्या पदांच्या २० टक्के पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत असे आदेश आहेत. तरी उर्वरित 10 टक्के अनुकंपा नियुक्तीबाबतची कार्यवाही पार पाडणेची आहे.

सदर अनुकंपा भरती 20 टक्के ची मर्यादा ही सन 2019 या कॅलेंडर वर्षापासून तीन वर्षासाठी (१ जानेवारी 2019 ते 31 डिसेंबर 2021) अंमलात राहील, असे स्पष्ट शासनाचे मार्गदर्शक सुचना आहेत. तरी आपले कार्यालयाकडील अधिनस्त कार्यरत असताना मयत झालेल्या शासकीय कर्मचा-याच्या कुटूंबातील एका पात्र वारसास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत संबंधीत वारसाने या कार्यालयाकडे



Scanned with CamScanner

प्रस्ताव पुर्ण / अपुर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्यामूळे अनुकंपा उमेदवाराने प्रस्ताव सादर करतेवेळी सादर केलेल्या कागदपत्रान्वये त्याच्या वैयक्तिक माहितीमध्ये असणा-या बदल, दुरूस्त्या तसेच हरकती, आक्षेप असल्यास सामान्य प्रशासन विभागाकडे प्रत्यक्षात दिनांक 16/03 /2021 पर्यंत समक्ष किंवा dyceogadstr@gmail.com या ई-मेल वर सादर करण्याबाबतचे अवाहन करण्यात यावेत. म्हणजे पुढील अंतिम जेष्ठता प्रतिक्षासूची तयार करण्यास सुलभ होईल व पुढील अनुकंपा भरती करण्याबाबत उचित यथानियम कार्यवाही करता येईल.

सोबत :- अनुसूचि यादी आपले कार्यालयाकडील
ई-मेलव्दारे पाठविणेत येत आहे.

(विनय गौडा जी सी, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा



Scanned with CamScanner